जा.क्र. ४३०६/२०१८ 18 JUL 2018

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०

**परिपत्रक क्र. ५४५ दिनांक १८.०७.२०१८**

राज्यात साधारणत: ४३० धर्मादाय रुग्णालये असून या रुग्णालयांनी मा.उच्च न्यायालयाच्या योजनेप्रमाणे त्यांचेकडील वापरातील एकूण खाटांच्या १०% खाटा या निर्धन रुग्णांकरीता व १०% खाटा या दुर्बल घटकांतील रुग्णांकरीता राखून ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार, राज्यात जवळपास ५,००० खाटा या निर्धन रुग्णांकरीता व ५,००० खाटा या दुर्बल घटकातील रुग्णांकरीता राखीव आहेत. असे असतानाही, अनेक धर्मादाय रुग्णालयांत सदर खाटा रिकाम्या राहत असल्याचे निदर्शनास येते. बहुतेक धर्मादाय रुग्णालयांच्या नावामध्ये 'धर्मादाय' अथवा 'चॅरीटेबल' हा शब्द नसल्यामुळे गरीब रुग्णांना ते रुग्णालय धर्मादाय आहे किंवा नाही याची माहिती होत नसावी. तसेच अनेक धर्मादाय रुग्णालयांच्या इमारतींकडे पाहुन गरीब रुग्णांना ते धर्मादाय रुग्णालय 'धर्मादाय' आहे अथवा कसे याबाबत माहिती होत नसावी. त्यामुळे धर्मादाय रुग्णालयांच्या नावामध्ये अथवा नावासमोर 'धर्मादाय' अथवा 'चॅरीटेबल' हा शब्द नमूद केल्यास, गरीब रुग्णांना ते रुग्णालय धर्मादाय रुग्णालय आहे याची जाणीव होईल, त्यांच्या मनात कुठलाही संभ्रम राहणार नाही आणि त्या ठिकाणी जाऊन ते मोफत तसेच सवलतीच्या दराने उपचार घेऊ शकतील व त्यांना त्याचा निश्चितच फायदा होईल.

त्यामुळे राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी आपआपल्या जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांना त्यांच्या नावामध्ये अथवा नावासमोर 'धर्मादाय' अथवा 'चॅरीटेबल' असे नमूद करण्यास व तसे प्रसिध्द करण्यास कळवावे व त्यानुसार धर्मादाय रुग्णालयांनी केलेल्या पुर्ततेबाबत या कार्यालयास अवगत करावे.

१८.७.१८
(शिवकुमार डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. अधिक्षक (रुग्णालय शाखा/आस्थापना शाखा), मुख्यालय
६. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)

D:\SWATI\Circulars\Marathi Circular 2.docx